# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११००५.

## प्र क ट न

क्र.पु.वि.मं./शाखा-क/ 1933
पुणे ४११ ००५.
दि.०७.११.२०१७

विषय- मार्च २०१८ मध्ये घेण्यात येणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी)
परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या सुधारित वाढीव तारखांबाबत...

या प्रकटनाव्दारे सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांना कळविण्यात येत की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) मार्च २०१८ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस नियमित प्रविष्ठ होणारे विद्यार्थी पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले पूर्वीचे खाजगी विद्याथी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ंठ होणारे विद्यार्थी व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर भरावयाची असून त्यांच्या सुधारित वाढीव तारखा खालीलप्रमाणे

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाव्दारे शुल्क भरावयाच्य तारखा | माध्यमिक शाळांनी निर्धारित केंद्रावर शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाच्य तारखा |
|---|---|---|---|
| नियमित शुल्कासह | सोमवार, दि.१६.१०.२०१७<br>ते<br>मंगळवार, दि.१४.११.२०१७ | **मंगळवार, दि.०७.११.२०१७<br>ते<br>शुक्रवार, दि.०१.१२.२०१७** | **शुक्रवार, दि.०८.१२.२०१७<br>सदर विद्यार्थ्यांच्या याद्या व चलन संबंधित शाळेने पुणे/अहमदनगर/सोलापूर जिल्हयामधील निर्धारित केंद्रावर जमा करावयाच्या आहेत. याची नोंद घ्यावी.** |
| विलंब शुल्कासह | बुधवार, दि.१५.११.२०१७<br>ते<br>गुरुवार, दि.३०.११.२०१७ | | |

**बुधवार दि. १५.११.२०१७ ते गुरुवार दि.३०.११.२०१७ या कालावधीत शाळांनी विद्यार्थ्यांच्य याद्या Excel** मध्ये प्रिटींग करणे.

१) सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे भरण्यासाठी आपल्या शाळेशी संपर्क साधावा. ऑनलाईन आवेदनपत्रे भरतांना येणा-या अडचणींबाबत मुख्याध्यापकांनी संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

**२) शासन निर्णयानुसार ऑनलाईन आवेदनपत्रे भरतांना विद्यार्थ्याचे संपूर्ण नावं, आईचे नावं, जन्म ठिकाण, विषय व विषय सूट, माध्यम यांची माहिती बिनचूक नमूद करण्याची कार्यवाही शाळांनी ऑनलाईन प्रक्रीयेमध्ये करण्यात यावी.**

३) शाळांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियात मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन बँक ऑफ इंडीयाची चलनाची प्रत, **विद्यार्थ्याच्या याद्या व पॅनल/शिक्षकांची माहिती (राहिली असेल तर,) दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.**

४) इ.१० वीची आवेदनपत्रे भरतांना आधार कार्ड क्रमांक नमूद करण्याबाबत अनिवार्य केलेले असले तरी एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नोंदणी केलेले असेल तर नोंदणी क्रमांक देखील ग्राहय धरण्यात येईल. नोंदणी देखील केलेली नसेल तर निकालापर्यंत आधार कार्ड काढण्यात येईल असे विद्यार्थ्याने मुख्याध्यापकांना लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे. आधार कार्ड क्रमांक नाही म्हणून आवेदनपत्र भरणे नाकारता येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

५) मार्च २०१८ परीक्षेकरिता खाजगी रित्या Online नावनोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांकरिता आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा स्वतंत्ररित्या कळविण्यात येतील.

६) सदर कालावधीमध्ये शाळांनी Online Pre-list करुन घ्याव्यात व Pre-list ची विद्यार्थ्यांमार्फत तपासणी करुन Online त्यांच्या दुरुस्त्या गुरुवार दि.३०.११.२०१७ अखेर करणे आवश्यक आहे. मंडळामार्फत वेगळी प्री-लिस्ट दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्विकृती केंद्र
पुणे- मंडळ कार्यालय, बारामती, नारायणगावं
अ.नगर- श्रीरामपूर व अ.नगर
सोलापूर- पंढरपूर व सोलापूर

(सही) 08/11/2017
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव**
**मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) - पुणे/अहमदनगर/सोलापूर**

E:\NYG\PRAKATAN